Sub: MARATHI R1 STD: IX

ANSWER KEY Sub.Code: 1002

Semester 1

| | | विभाजीत गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | अचूक पर्याय निवडा | | 3 |
| 1. | छत्रीची आठवण होते. | 1 | |
| 2. | त्यांना विद्या मिळवायची होती. | 1 | |
| 3. | आच्छादन म्हणून केला. | 1 | |
| | कोणी कोणास म्हटले. (कोणतेही दोन) | | 2 |
| 4. | व्यापाऱ्याने/मालकाने नोकरास म्हटले | $\frac{1}{2}+\frac{1}{2}$ | |
| 5. | माहिती देणाऱ्या माणसाने लेखिका उषा पाणंदीकर यांना म्हटले | $\frac{1}{2}+\frac{1}{2}$ | |
| 6. | म्हाताऱ्याने भगदत्ताला म्हटले | $\frac{1}{2}+\frac{1}{2}$ | |
| | एका वाक्यात उत्तरे (कोणतेही दोन) | | 2 |
| 7. | पीक, माती, हवामान | 1 | |
| 8. | लोकसाहित्यातून, लोकजीवनातून | 1 | |
| 9. | 'मला तू विसराळू समजतेस? ही पहा आणली नाही मी छत्री?' | 1 | |
| | लेखकाचे नाव | | 1 |
| 10. | प्रा. मुक्ता गरसोळे कुलकर्णी | 1 | |
| | पाठाचे नाव | | 1 |
| 11. | असा हा आसाम | 1 | |
| | दोन ते तीन वाक्यांत (कोणतेही दोन) | | 4 |
| 12. | परंपरेने चालत आलेल्या शेतीत संजय भाईंचे मन रमेना. 'ठेविले अनंते तैसेची राहावे\|चित्ती असू द्यावे समाधान\|'हा मंत्र जपून माणसाचा विकास होत नाही म्हणून त्यांनी शेतीच्या पद्धतीत नवीन प्रयोग करायचे ठरविले. | 2 | |
| 13. | म्हातारीचा कोंबडा पहाटे जोरदार बांग द्यायचा आणि त्याबरोबर सारे गावकरी उठून आपला दिनक्रम चालू करायचे. साऱ्या गावकऱ्यांना म्हातारीचा कोंबडा हेच घडयाळ झाले होते. म्हणून.... | 2 | |
| 14. | भगदत्ताने नम्रपणे म्हाताऱ्याला सांगितले की," आजोबा, मीही एखादी नवी विद्या शिकून येणार आहे. सर्वांच्या उपयोगी पडेल, अशी!" | 2 | |
| | चार ते पाच वाक्यांत (कोणतेही दोन) | | 6 |
| 15. | आसाम मधील 'काझिरंगा' अभयारण्याचे एकशिंगी गेंडा हे भूषण आहे. गेंडा हा प्राणी हत्तीच्या आकाराचा असतो. १४-१५ फूट लांब, १० फूट रुंद, ९-१० टन वजनाचा असा हा अवाढव्य प्राणी आहे. त्याच्या अंगावर चामड्याच्या रंगाचे काळे तपकिरी टणक कातीचे चिलखत असते. गेंडा हा शांत प्राणी आहे. त्याच्या नाकावर एक शिंग असते. पण त्यात हाड नसते उलट केसात असलेल्या कॅरोटिनसारख्या तंतूमय प्रोटीन्स | 3 | |

| | | | |
|---|---|---|---|
| | पदार्थापासून ते बनलेले असते. अशा प्रकारे लेखिकेने एकशिंगी गेंड्याचे वर्णन केले आहे. | | |
| 16. | ऐन पावसाळ्यात छत्री उपयोगाची असतेच. पण त्या शिवाय उत्साहाने पैसे मोजून आणलेल्या छत्रीचे अन्य उपयोगही लक्षात ठेवण्यासारखे असतात असे लेखकाचे म्हणणे आहे. चार चौघांपासून चटदिशी तोंड लपवायचे असेल तर छत्रीच आपल्या मदतीला येते. अचानक कुणी आपल्यावर हल्ला करायच्या बेतात असेल तर छत्री खाकोटीला मारून पळत सुटता येते. नवरा बायकोच्या भांडणाच्यावेळी शस्त्र म्हणून ही छत्री वापरता येते. ज्याच्या हाती छत्री असते तो वा ती या भांडणात जिंकते. अशा प्रकारे लेखकाने छत्रीचे विविध उपयोग विनोदी ढंगात सांगितले आहेत. | 3 | |
| 17. | एक चोर एका घरात चोरी करून पळून जात असतो. तेवढ्यात कोणीतरी त्याला पाहतो व आरडाओरड करण्यास सुरुवात करणार, एवढ्यात तोच चोर एक युक्ती करतो. आरडाओरडा झाल्यावर लोक जमा होऊन आपल्याला पकडतील, म्हणून तो स्वतःच 'चोर चोर' म्हणून ओरडायला लागतो. जो स्वतःच 'चोर चोर' म्हणून ओरडतोय तोच कसा चोर असेल? असा विचार करून तो चोर नाही असे लोक समजतात व ते फसतात आणि दुसरीकडे चोराचा शोध घेत धावू लागतात. त्याचा फायदा घेऊन खरा चोर पसार होतो. | 3 | |
| | अचूक पर्याय निवडा | | 3 |
| 18. | हरि हा बाळक नंदा घरीं | 1 | |
| 19. | दुःख शोकासि मूळ | 1 | |
| 20. | सदैव हृदयात | 1 | |
| | मोकळ्या जागी योग्य शब्द | | 2 |
| 21. | देव | 1 | |
| 22. | थांबवा | 1 | |
| | एका वाक्यात उत्तरे (कोणतेही दोन) | | 2 |
| 23. | चित्तात सदा सद्विचार असावेत | 1 | |
| 24. | ज्याने पृथ्वी तृप्त केली | 1 | |
| 25. | राष्ट्राच्या कार्यासाठी झटत असताना | 1 | |
| | तीन ते चार वाक्यांत उत्तरे (कोणतेही दोन) | | 6 |
| 26. | अती नम्र व्यक्तीला लोक भीती दाखवतात. एखाद्याशी अती वाद घातल्यास आपण सत्यापर्यंत लवकर पोहोचू शकत नाही. तसेच औषधांचे अती सेवन रोग वाढवते. यामुळे नम्रता, वाद व औषध हे प्रमाणात असावे असे कवी म्हणतात. | 3 | |
| 27. | कवीच्या मते, जरी आपल्यामध्ये अनेक जाती आणि धर्म असले तरी माणुसकीचे नाते सर्वात महत्त्वाचे आहे. द्वेष, संदेह आणि राग या भावना मनातून काढून टाकल्या पाहिजेत. एकमेकांशी प्रेम, सहकार्य आणि समजूतदारपणा ठेवला तर माणुसकीची नाती टिकवता येतात. कवी बापट सर्व भारतीयांनी बंधुभावाने वागावे, असा संदेश देतात. | 3 | |
| 28. | तुकाराम महाराजांना बालकृष्ण हा अनंत ब्रह्मांडाचा उद्धारकर्ता असूनही बालकरूपाने नंदाघरी अवतरला आहे याचे नवल वाटते. पृथ्वीला तृप्त करणाऱ्याला याशोदा माता भोजन घालते. विश्वव्यापी कमळापती बालरूपात आल्यावर गौळणी त्याला कडेवर | 3 | |

| | | | |
|---|---|---|---|
| | घेतात. वेगवेगळी रूपे धारण करणारा हा देव मानव रूप घेतल्यावर सर्व प्रकारचे सुख-दुःखाचे भोग भोगूनही ब्रह्मचारी राहतो याचे तुकारामांना नवल वाटते. अशा प्रकारे संत तुकारामांनी बालकृष्णाविषयी नवलाईचा भाव व्यक्त केला आहे. . | | |
| 29. | खाण्याची तीव्र इच्छा होणे | | 1 |
| 30. | गावकऱ्यांनी चोराला चांगला धडा शिकविला. | | 1 |
| 31. | नाम | | 1 |
| 32. | क्रियाविशेषण अव्यय | | 1 |
| 33. | भरड | | 1 |
| 34 | वाड-वडिलांकडून मिळालेली | | 1 |
| 35. | , | | 1 |
| 36. | व्युत्पत्ती | | 1 |
| 37. | दाट | | 1 |
| 38. | पावसाळा सुरू झाला. | | 1 |
| 39. | भाववाचक नाम (को. एक)<br>• हावरटपणा<br>• स्वच्छता | | 1 |
| 40. | विशेषण लिहा (को. एक) | | 1 |
| | • रंगीत<br>• स्वप्नाळू | 1<br>1 | |
| 41. | लिंग बदला (को. एक) | | 1 |
| | • बैल<br>• नवरी/बायको | 1<br>1 | |
| 42. | विरुद्धार्थी शब्द (को. एक) | | 1 |
| | • लहान/छोटा<br>• विक्री | 1<br>1 | |
| 43. | वचन बदला (को. एक)<br>• भिंती<br>• यंत्र | 1<br>1 | 1 |
| 44. | त्या दोघा मित्रांची पुन्हा भेट होईल/होणार. | | 1 |
| | पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा. | | 5 |
| 45. | विद्यार्थी वाचन करतो, चर्चा करतो, निरीक्षण करतो आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकतो तेव्हा | 1 | |
| 46. | ज्ञानाची तीव्र ओढ | 1 | |

| | | | |
|---|---|---|---|
| 47. | उत्सुकता हीच नवीन गोष्टी शिकण्याची पहिली पायरी असते म्हणून | 1 | |
| 48. | पुस्तके, ग्रंथालये, प्रयोग, शैक्षणिक उपक्रम आणि तंत्रज्ञान | 1 | |
| 49. | जिज्ञासू विद्यार्थी किंवा तत्सम | 1 | |
| 50. | संवाद लेखन<br>भाषाशैली --- वाक्यरचना ---- विरामचिन्हे पाहून गुण द्यावेत.<br>केवळ एका शब्दाने संवादपूर्ती केल्यास गुण देताना विचार करावा. | | 5 |
| 51. | पत्रलेखनात पाच गुण पुढीलप्रमाणे विभागून द्यावेत.<br>* पत्र लिहिणाऱ्याचा पत्ता व दिनांक | ½ | 5 |
| | * मायना संबोधन<br>अभिवादन | 1<br>½<br>½ | |
| | * विषय विस्तार व परिच्छेद विभागणी | 2 | |
| | * भाषाशैली | 1 | |
| | * योग्य समारोप | ½ | |
| 52. | गोष्ट लेखनास पुढीलप्रमाणे गुण विभागून द्यावेत.<br>अपूर्ण गोष्टीचा योग्य प्रकारे केलेला विस्तार, गोष्टीची मांडणी, वाक्यरचना<br>विचारसुसूत्रता, आकर्षक शेवट | 4 | 5 |
| | * योग्य शीर्षक | 1 | |
| 53. | वृत्तान्त लेखन<br>दिनांक, स्थळ व क्रमबद्ध घटना ----- समग्र चित्रण करणारे वर्णन ---- वर्णनातील एकसूत्रता, भाषाशैली, योग्य वाक्यरचना व वृत्तान्ताचे एकूण स्वरूप पाहून एकत्र गुण द्यावेत. | | 5 |
| 54. | निबंध लेखनास सात गुण पुढीलप्रमाणे द्यावेत.<br>* अनुरूप प्रस्तावना | 1 | 7 |
| | * विषय विस्तार व परिच्छेदात्मक रचना | 3 | |
| | * भाषाशैली व सुसूत्र विचार | 1 | |
| | * परिणामकारक शेवट | 1 | |
| | * शुद्धलेखन व सुवाच्य अक्षर | 1 | |
| | | | |